आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२२ मार्च २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं संरक्षण आणि त्याचा जबाबदारीनं वापर करण्यासाठी आपण सर्व वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- रशियाहून कच्चं तेल घेऊन येणारं ॲक्वा टायटन हे जहाज कर्नाटकात मंगळुरु इथल्या बंदरात दाखल

- आर्थिक घोटाळ्याप्रकरणी उद्योगपती अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कमर्शियल फायनान्स कंपनीची सीबीआयकडून चौकशी

- इंडियन ओपन स्क्वॉश स्पर्धेत पुरुष गटात भारताचं विजेतेपद निश्चित/ महिला गटात अनाहत सिंगकडून पदकाची अपेक्षा

**आणि**

- होर्मूझची सामुद्रधुनी येत्या ४८ तासांत खुली केली नाही, तर इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

**<><><><><>**

पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं संरक्षण आणि त्याचा जबाबदारीनं वापर करण्यासाठी आपण सर्व वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पाणी जीवनाचा आधार असून पृथ्वीच्या भविष्याचा आकार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आंतरराष्ट्रीय जल दिनाच्या निमित्तानं दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्र संघानं देखील या निमित्तानं पाणी आणि लिंग समानता या अनुषंगानं ‘जिथे पाणी वाहतं तिथं समानता वाढते’ ही संकल्पना मांडली असून जल व्यवस्थापनातली महिलांची महत्वपूर्ण भूमिका आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे त्यांच्यावर होणारा परिणाम तसंच त्याबाबतच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अधोरेखित केला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी चैत्र नवरात्रीच्या आध्यात्मिक महत्त्वाबद्दल आपले विचार मांडले असून मातृदेवीच्या भक्तीतून मिळणारी ऊर्जा आणि शक्ती यावर भर दिला आहे.

मातृभक्तीत अपार शक्ती आहे, देवी मातेला केलेलं वंदन भक्तांच्या मनाला सकारात्मक ऊर्जेने परिपूर्ण करतं, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सत्तेतले ८ हजार ९३१ दिवस पूर्ण केले असून भारतीय राजकारणात ते सर्वाधिक काळ सत्तेत असलेले नेते ठरले आहेत. त्यांनी सिक्कीमचे मुख्यमंत्री पवन चामलिंग यांना मागे टाकले आहे. गुजरातचे मुख्यमंत्री आणि देशाचे प्रधानमंत्री म्हणून मोदी यानी सत्तेत २५ वर्षं पूर्ण केली आहेत.

<><><><><>

रशियाहून कच्चं तेल घेऊन येणारं ॲक्वा टायटन हे जहाज आज कर्नाटकात मंगळुरु इथल्या बंदरात पोहोचलं. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे जगभरात वाढलेल्या इंधनाच्या किमती स्थिर करण्याच्या उद्देशानं अमेरिकेनं समुद्रात उभ्या असलेल्या रशियाच्या तेलवाहू जहाजांना पुढे जाण्याची परवानगी दिल्यानंतर हे जहाज भारतात आलं आहे. याशिवाय अमेरिकेहून एलपीजी घेऊन येणारं एक मालवाहू जहाज देखील मंगळुरु इथं पोहोचलं आहे.

<><><><><>

सीबीआयनं कथित आर्थिक घोटाळा प्रकरणी सहभाग असल्याबद्दल अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कमर्शियल फायनान्स या कंपनीची चौकशी सुरु केली आहे. त्याअंतर्गत आज सीबीआयनं ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या सल्लागाराची चौकशी केली. या कंपनीनं रिलायन्स कमर्शियल फायनान्स आणि रिलायन्स होम फायनान्स या सध्या चौकशी सुरु असलेल्या दोन कंपन्यांची मालमत्ता खरेदी केली आहे, असं सीबीआयनं म्हटलं आहे. बँक ऑफ महाराष्ट्रनं गेल्या वर्षी यासंदर्भात तक्रार दाखल केली होती.

याशिवाय सीबीआनं हजारो कोटी रुपयांच्या एका मोठ्या बँक घोटाळा प्रकरणात रिलायन्स एडीए ग्रुपच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी केली. स्टेट बँक ऑफ इंडियाने केलेल्या तक्रारीनंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला होत.

<><><><><>

पुद्दुचेरीसह चार राज्यांमधे होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्व मतदान केंद्रांवर सर्व सुविधा पुरवल्या जातील असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. या पाचही राज्यांमधल्या तसंच पोटनिवडणूक असलेल्या राज्यांमधल्या मतदान केंद्रांवर सर्व सुविधा

पुरवल्या जातील याची खात्री करण्याचे निर्देश आयोगाने मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिले आहेत. मतदार केंद्रावर मतदार सहाय्यता केंद्र, पिण्याचं पाणी, शौचालय, प्रकाश व्यवस्था, दिव्यांगांसाठी रॅम्प या सुविधा आवश्यक आहेत. प्रत्येक केंद्रावर केंद्रस्तरावरील अधिकारी उपस्थित असतील, जे मतदारांना त्यांचा अनुक्रमांक शोधून देण्यास मदत करतील.

<><><><><>

इंडियन ओपन २०२६ स्क्वॉश स्पर्धेत पुरुष गटात भारताच्या अभय सिंग आणि वीर चोत्रानी यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आज मुंबईत होणाऱ्या अंतिम सामन्यात या दोघांमध्ये विजेतेपदासाठी लढत होणार असून भारताचं पदक निश्चित झालं आहे. महिला गटात भारताच्या अनाहत सिंग हिचा सामना आज संध्याकाळी इजिप्तच्या हाना मोताझ हिच्याशी होईल. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात अनाहतने भारताच्याच तन्वी खन्ना हिचा ३-१ ने पराभव केला होता.

<><><><><>

इराणने होर्मूझची सामुद्रधुनी येत्या ४८ तासांमध्ये खुली केली नाही, तर इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर विध्वंसक हल्ले केले जातील असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. हे हल्ले इराणच्या सर्वात मोठ्या ऊर्जा प्रकल्पापासून सुरु होतील, आणि त्यानंतर इतर प्रकल्पांचं लक्ष्य साधलं जाईल असं त्यांनी समाज मध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. अमेरिकेने काही आठवड्यांपूर्वीच आपलं निर्धारित उद्दिष्ट साध्य आहे, त्यामुळे आता इराणला करार करायचा असला, तरी अमेरिकेला त्यामध्ये कोणताही रस नसल्याचं ट्रम्प यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

इराणनं इस्रायलच्या 'दिमोना' आणि 'अराद' या शहरांवर काल बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा हल्ला केला. इराणमध्ये दिमोना शहरात 'नेगेव्ह अणुसंशोधन केंद्र' आहे. आपल्या 'नतान्झ' इथल्या अणु संशोधन केंद्रावरच्या कालच्या हल्ल्याला हे थेट प्रत्युत्तर असल्याचं इराणनं म्हटलं आहे. या हल्ल्यामुळे अणुसंशोधन केंद्राची हानी झाली नाही, तसंच किरणोत्सर्गाची असामान्य पातळी आढळून आली नाही, तरीही इस्राएलच्या दिमोना आणि अराद या दोन शहरांमध्ये एकूण १३० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाल्याचं आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेनं

म्हटलं आहे. दरम्यान, इराण विरोधातली मोहीम आणखी तीव्र केली जाईल असा इशारा इस्त्राएलनं दिला आहे.

दरम्यान, सौदी अरेबियामध्ये, रियाधच्या आकाशात काल तीन बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आढळून आली. त्यापैकी एकाला मध्येच रोखण्यात आलं, तर इतर दोन क्षेपणास्त्र मानवी वस्ती नसलेल्या भागात कोसळली. त्यानंतर, इराणनं '२०२३ च्या बीजिंग करारा'चं आणि 'संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावाचं उल्लंघन केल्याचा आरोप करून, रियाधननं इराणच्या लष्करी आणि दूतावासातल्या कर्मचाऱ्यांना २४ तासांमध्ये सौदी अरेबिया सोडून जाण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

होर्मुझच्या सामुद्रधुनीत सुरुंग रोधक मोहिमेसाठी जपान आपलं स्वसंरक्षण दल तैनात करण्याचा विचार करत असल्याचं जपानचे परराष्ट्र मंत्री तोशिमित्सू मोतेगी यांनी म्हटलं आहे. दूरचित्रवाणीवर एका कार्यक्रमात त्यांनी जपानच्या प्रगत सागरी क्षमता अधोरेखित केल्या. इराण, अमेरिका आणि इस्त्रायल यांच्यात युद्धविराम झाला, तरच या पर्यायाचा विचार केला जाऊ शकतो, असं त्यांनी यावेळी सांगितलं. अमेरिकेबरोबर गेल्या आठवड्यात झालेल्या उच्च-स्तरीय राजनैतिक चर्चेच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी हे संकेत दिले.

**<><><><><>**

पश्चिम आशियामधल्या देशांच्या नागरिकांवर तसंच महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर इराणने केलेल्या हल्ल्याचा जी सेवन देशांनी निषेध केला आहे. यामुळे पश्चिम आशियातल्या देशांनाच नाही तर जागतिक सुरक्षेला धोका उत्पन्न झाल्याचं जी सेवन देशांनी म्हटलं असून इराणला आपल्या कारवाया थांबवण्याचं आवाहन केलं आहे. हार्मुजची सामुद्रधुनी तसंच इतर सागरी मार्गांची सुरक्षितता सुनिश्चित करणं महत्त्वाचं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. इराणला अण्वस्त्र निर्मिती करू न देण्याचा पुनरूच्चार जी सेवन देशांनी केला तसंच इराणला क्षेपणास्त्रं हल्ले थांबवण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

मालदीवमधे स्पीडबोट उलटल्याने झालेल्या अपघातात रेमंड ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक गौतम हरी सिंघानिया किरकोळ जखमी झाले असून दोन भारतीय नागरिक बेपत्ता

आहेत. सिंघानिया यांना उपचारानंतर घरी सोडण्यात आलं. मालदीवमधल्या फेलीदू बेटाजवळ शुक्रवारी हा अपघात झाला. यावेळी बोटीत सात प्रवासी होते.

<><><><><>

हिमालयाशी संलग्न असलेल्या पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या काही भागांमध्ये आज वीजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. याशिवाय गंगेच्या खोऱ्याजवळचा पश्चिम बंगालचा काही भाग, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, ओडिशा आणि पश्चिम राजस्थानमध्येही दिवसभर असंच वातावरण राहण्याची शक्यता आहे. तर केरळ आणि माहे इथं उद्यापर्यंत उष्ण आणि दमट हवामान असेल.

<><><><><>

पाकिस्तानमध्ये लष्कर-ए-तैयबा या दहशतवादी संघटनेचा कमांडर बिलाल आरिफ सराफी याचा काल ईदच्या नमाजानंतर त्याच्या कुटुंबीयांनीच चाकूनं हल्ला करून आणि गोळ्या झाडून खून केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना मुरीदके इथल्या मार्कझ भागातल्या लष्कर-ए-तैयबाच्या मुख्यालयाजवळ घडली. या हत्येमागचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालं नसलं तरी प्राथमिक माहितीनुसार हा प्रकार कौटुंबिक वादातून घडल्याचा संशय व्यक्त गुप्तचर संस्थांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी उद्या महत्त्वपूर्ण आणि सामरिक खनिजांच्या ब्लॉक्सच्या लिलावाची सातवी फेरी सुरू करतील. सातव्या टप्प्यात, विविध राज्यांमध्ये खाणपट्टा आणि संमिश्र परवान्या अंतर्गत १९ ब्लॉक्स उपलब्ध करून दिले जातील.

//<><><><><>//